

## बीड नगर पालिकेतील लेखा विभागात गणेश पगारेंनी नेमकं केलयं काय?


# लेखापाल पदभार घेण्यासाठी अधिकारी भितीच्या दहशतीत

## मुख्याधिकारी अंधारे मॅडमचा कारभार म्हणजे आंधळं दळतयं अन् कुत्र पीठ खातयं

# बीड नगर पालिकेचे घेणे देणे नसल्यासारखे वागणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांना बीडमधून हाकला!

बीड (सरकार): बीड नगर पालिकेचा कारभार म्हणजे विशेष करून मुख्याधिकारी निता अंधारे यांचे म्हणजे आंधळ दळतयं अन् कुत्र पीठ खातयं असा झाला आहे. केवळ शासकीय वेळेत बीड नगर पालिकेत येऊन बसणे आणि निघून जाणे एवढेच कर्तव्य मुख्याधिकारी बजावत आहेत. बीड नगर पालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे पगार, गुत्तेदारांचे बिल, साफसफाई कर्मचाऱ्यांचे मानधन त्याच बरोबर अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात केलेला भ्रष्टाचार याचे घेणे देणेच नाही अशा अविर्भावात मुख्याधिकारी हातात पेन हलवत आपला कारभार करत आहेत. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी टाईमपास म्हणून नोकरी करणारे आणि बीड नगरपालिकेला केवळ वेळकाढूपणा करणाऱ्या निता अंधारेंना बीडमधून हाकलावे आणि लेखा विभागात झालेला भ्रष्टाचार याची चौकशी करून संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत अशी चर्चा होत असताना बीड नगरपालिकेतील लेखा विभाग सांभाळणारे तत्कालीन लेखापाल गणेश पगारेंनी या लेखा विभागात नेमके काय करून ठेवले आहे . जेणे करून बीड नगर पालिकेतील कोणताही अधिकारी लेखापाल पदाचा पदभार घेण्यासाठी भितीच्या दहशतीत वागत आहे. त्यामुळे परवा पालकमंत्री बीडमध्ये दोन चार दिवसात येणार असून त्यांनी तातडीने बीड नगर पालिकेच्या संदर्भात निर्णय घ्यावा आणि मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या संदर्भात त्यांच्या बदलीसाठी पाऊले उचलावीत अशी चर्चा होत आहे.

बीड नगरपालिका एकेकाळी या नगर पालिकेतून सोन्याचा धूर निघत होता. मात्र याच नगर पालिकेला आता भ्रष्ट कारभार , टाईमपास म्हणून अधिकारी, कर्मचारी खेळणीसारखा वापर करत असल्याचे दिसून येत आहे. बीड नगरपालिकेतील भ्रष्टाचार एवढा शिगेला गेला आहे की, बोगस बिले , विविध कंपन्यांच्या नावावर अव्वाच्या सव्वा टेंडर देऊन बिले उचलण्याचा गंभीर प्रकार झाला असल्याचा आरोप होत आहे. त्याचबरोबर बीड नगर पालिकेतील भांडार हे शो ची वस्तू झाली आहे. येथील भांडारपाल अतिशय मग्रूर असून स्वत:ला मुख्याधिकारी समजत आहे. एक दिवस भांडारपालच्या पापाचा घडा पालथा होणार आहे आणि बीडनगर पाहणार आहेत. मात्र भांडारपालला पाठीशी घालण्याचा प्रयत्न मुख्याधिकारी करीत असल्याचा आरोप होत असून याच भंडारामध्ये मोठ मोठ्या अधिकाऱ्याचा भ्रष्ट कारभार दडला आहे. आणि लेखा विभागात झालेला गंभीर प्रकार सफाई कामगारांचे खरे कर्मचारी आणि खोटे कर्मचारी याचा चिठ्ठा जाणून बुजून लपवून ठेवला आहे. त्याच बरोबर भ्रष्टाचाराचे आरोप झालेले गणेश पगारे यांची तातडीने झालेली बदली आणि त्यांची रिक्त झालेली जागा पाहता त्या पदाचा पदभार घेण्यासाठी बीड नगरपालिकेतील एकही अधिकारी, कर्मचारी पुढे येत नाही. त्यामुळे लेखापाल गणेश पगारेंनी लेखा विभागात नेमकं केलयं काय जेणे करून पदभार घेण्यासाठी अधिकारी,कर्मचारी भितीच्या दहशतीत वागत आहेत. त्याचबरोबर बीड नगरपालिकेच्या कारभाराचं काही घेणे देणं नाही अशा अविर्भावात वागणाऱ्या निता अंधारे यांनी तर बीड नगरपालिका टाईमपास असल्यासारखे वागत आहेत. कधीही येणे, कधीही जाणे बीड नगरपालिकेत काय चालले आहे. कशाशीही काही घेणे नसल्यासारखे वागणे, यांच्यापुढील कारभार धोकादायक असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड नगरपालिकेतील भ्रष्ट कारभाराची चौकशी करावी , बीड नगरपालिकेतील भांडारपाल, लेखा विभाग, टेंडर विभाग, त्याचबरोबर सफाई कामगार या सर्व गोष्टीची चौकशी करून दोषी अधिकारी,कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल करावेत अशी चर्चा होत असताना पालकमंत्री यांनी कमीत कमी बीडकरांसाठी बीड नगरपालिकेचा कारभार सुधारण्यासाठी पाऊले उचलावीत अशी मागणी होत आहे.





सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar






बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २२२ वा ■ बुधवार ३० एप्रिल २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक १ मे २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 222 ■ Wednesday 30 April 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


## मराठा यौद्धा मनोज जरांगेंचा अल्टीमेटम;२९ ऑगस्टला मराठे धडकणार

# विजयाचा आणि अंत्ययात्रेचा रथ घेऊन मुंबईत

जालना (सरकार): मराठा आरक्षणासाठी लढणारे नेते मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, २८ ऑगस्टपर्यंत त्यांच्या ८ ते ९ प्रमुख मागण्या मान्य न झाल्यास ते २९ ऑगस्ट रोजी मुंबईत जाऊन आमरण उपोषण सुरू करणार आहेत. यासोबतच, अंतरवाली सराटीत चालू असलेले उपोषणही कायम राहणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना जरांगे पाटील म्हटले की, मी मुंबईला जाताना विजयाचा आणि अंत्ययात्रेचा असे दोन रथ घेऊन जाणार आहे. हे केवळ आंदोलन नाही, तर मराठा समाजाच्या आत्मसन्मानाची लढाई आहे. जरांगे पाटील यांनी सरकारकडे मागणी केली की, मराठा आणि कुणबी एकच आहेत असा आद्यादेश तातडीने काढावा.५८ लाख नोंदींचे पुरावे देऊनही आरक्षणाचा कायदा केला



गेलेला नाही. मागील दोन वर्षांपासून संयम पाळला जात आहे. अनेक मागण्या प्रलंबित असून संबंधित अधिकाऱ्यांचा जातीय दृष्टिकोन आड येतोय, असा आरोप त्यांनी केला.

मराठा-कुणबी एक असल्याचा आद्यादेश त्वरित काढावा ५८ लाख नोंदींच्या आधारे तत्काळ प्रमाणपत्रे द्यावीत आंदोलकांवरील सर्व संबंधित केसेस मागे घ्याव्यात सगे सोयरे अंमलबजावणी करावी संस्थानांच्या (हैदराबाद, औंध, सातारा, मुंबई) गॅझेट्स लागू करावेत सर्व जाती-धर्मातील मुलींना मोफत शिक्षण मिळावे आंदोलन शांततेतच होईल २८ ऑगस्टनंतर जर मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर माझ्या मराठा बांधवांसोबत मी मुंबईत उतरणार आणि तेथे आमरण उपोषण करणार आहे. मात्र, आंदोलन शांततेतच होईल. कुणालाही धक्का लागू नये, ही माझी अपेक्षा आहे, असे जरांगे यांनी शेवटी स्पष्ट केले.

# माजी उपसभापती सोळंके यांचा जामीन फेटाळला

माजलगाव (सरकार): माजलगावचे अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळुंके यांचे समर्थक माजलगाव पंचायत समितीचे उपसभापती सुशील सोळंके यांच्यासह त्यांच्या समर्थकावर शहरातील अशोक सोळंके यांच्या दुकानात जाऊन हल्ला केल्याप्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी औरंगाबाद खंडपीठात अर्ज दाखल केला होता.

दोन महिन्यांपूर्वी सोळंके यांना खंडपीठाने २ महिन्यांच्या दिलेल्या अंतरिम जामीनची मुदत संपल्यानंतर सुशील सोळंके यांनी खंडपीठात धाव घेतली असता, प्रथमदर्शनी गुन्ह्यातील सहभाग, गुन्हेगारी पार्श्वभूमी या कारणास्तव सोळंके यांचा अटकपूर्व जामीन न्यायमूर्ती अरुण पेडणेकर यांनी फेटाळून लावला आहे. त्यामुळे आता सुशील सोळंके यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे.

माजलगाव येथील अशोक बाळासाहेब सोळंके यांनी माजलगाव शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून सुशील सोळंके व इतर ६ आरोपींविरुध्द तक्रार दाखल केली होती. सुशील सोळंके याची आई ग्रामपंचायत सरपंच असून, तक्रारदार अशोक सोळंके व त्याच्या भावाने ग्रामपंचायत निवडणुकीत सोळंके यांच्या आईच्या विरोधात प्रचार केला होता.

# बीडमध्ये चार लाखांचा गुटखा पकडला

## तघांविरुद्ध गुन्हा दाखल

बीड (सरकार): बीड शहरातील हत्तीखाना कागदी दरवाजा व जुना बाजार हाफीज गल्ली भागात प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून आला असून, पोलीसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १.३५ ते ३.०० या वेळेत पोलिस उपनिरीक्षक संदिप नेवरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने हत्तीखाना व जुना बाजार भागात छापा टाकून सुमारे ४,४७,९०९ रुपयांचा



प्रतिबंधित गुटखा, पान मसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला.या प्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे: मोमीन तखीयोद्दीन (वय ३३), रा. हत्तीखाना, कागदी दरवाजा, बीड,शोएब खान , रा. जुना बाजार, हाफीज गल्ली, बीड, वाजेद खान , रा. जुना बाजार, हाफीज गल्ली, बीड या आरोपींनी महाराष्ट्र शासनाने गुटख्यावर घातलेल्या बंदीची माहिती असूनही आपल्या घरात गुटखा विक्रीसाठी साठवून ठेवला होता. या प्रकरणी त्यांच्या विरोधात कलम १२३, २२३, २७४, २७५, ३(५) बी.एन.एस व अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदिप नेवरे करत आहेत.

## नाशिकच्या रामकुंडावरून पाय घसरला, बीडचा तरुण गोदापात्रात वाहून गेला

नाशिक (सरकार): नाशिकच्या पवित्र रामकुंडावर गेलेल्या एका तरुणाचा पाय घसरल्याने तो क्षणार्धात गोदावरीत वाहून गेल्याची घटना समोर आलीय.बीड जिल्ह्यातील हा तरुण पाय घसरून थेट गोदावरी नदीत पडला आणि क्षणातच नदीच्या जोरदार प्रवाहात वाहून गेलाय. गोदावरी नदीच्या पात्रात सध्या तब्बल १ हजार क्युसेक वेगाने विसर्ग सुरू आहे. हा तरुण गोदावरीत पडल्याने वाहून गेला असून, अद्याप त्याचा थांगपत्ता लागलेला नाही.

गोदावरी पात्रात सध्या मोठ्या प्रमाणात पानवेलींचे जाळं तयार झालं असून, त्या पानवेलीत हा तरुण अडकलेला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गउइ च्या सहाय्याने नदीतून पानवेली हटवण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. प्रशासनाकडून शोधमोहीम सुरु करण्यात आली असून, प्रवाहातील प्रत्येक संभाव्य भागाची तपासणी केली जात आहे. श्राद्धपक्षामुळे रामकुंड परिसरात मोठी वर्दळ असतानाच ही दुर्घटना घडल्याने परिसरात भीतीचं आणि चिंतेचं वातावरण आहे.

## परळी रेल्वे स्टेशन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील मोहिनी दारू विक्रीवर बंदीची मागणी

परळी (सरकार): परळी रेल्वे स्थानकाजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यालगत सुरू असलेल्या 'मोहिनी' दारू दुकानामुळे संतप्त भावना उसळल्या असून, अंबेडकरी संघटनांनी तात्काळ दारू विक्री बंद करण्याची मागणी करत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

महामानवाच्या पवित्र स्मारकाजवळ दारू विक्री म्हणजे सामाजिक विटंबना असून, ही बाब सहन केली जाणार नाही, असा इशारा देत अंबेडकरी कार्यकर्त्यांनी प्रशासनावर तीव्र रोष व्यक्त केला आहे. दारू विक्रीला परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर आणि दुकान चालवणाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा उग्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा संघटनांनी दिला. स्थानिक नागरिकांनी देखील या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत,

**आंबेडकरी संघटनांचा इशारा?**

पुतळ्याजवळील परिसर 'संवेदनशील आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण' असल्याने, अशा दुकानांना तिथे कोणतीही जागा नसल्याचे मत नोंदवले आहे. प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्यामुळे, अंबेडकरी संघटनांनी लवकरच मोठा उठाव करत तीव्र आंदोलना तयारी दर्शवली आहे.बाबासाहेबांचा अपमान खपवून घेतला जाणार नाही. जर आमच्या मागण्या ऐकल्या गेल्या नाहीत, तर परळीमध्ये तीव्र सामाजिक असंतोष उफाळून येईल, असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# राज्यात पुन्हा उष्ण लहरी तीव्र

पुणे (सरकार):राज्यातील उष्ण लहरी पुन्हा तीव्र होण्यास सुरुवात झाली असून मंगळवारी (दि.२९) अकोला ४४.६ तर पुणे शहरातील लोहगाव आणि कोरेगावचे तापमान ४२ अंशांवर गेले होते. राज्यातील सर्वच जिल्हा भट्टीप्रमाणे तापला असून यंदाचा उन्हाळा असह्य ठरला आहे.

यंदाचा एप्रिल आजवरच्या अनेक उन्हाळ्यात वेगळा आणि सर्वांत उष्ण ठरला आहे. कारण उन्हाळ्यात पडणारा सरासरी पाऊस एकही दिवस न झाल्याने उन्हाची तीव्रता अतिप्रखर गटांत गणली गेली. दिवसभर वणवा पेटावा तसा यंदाचा उन्हाळा जाणवत असल्याचे नागरिकांसह शास्त्रज्ञांचे मत आहे. मंगळवारी राज्यातील बहुतांश भागाचे तापमान ४२ ते ४३ अंशांवर गेले होते. प्रामुख्याने विदर्भ अन् मध्य, उत्तर महाराष्ट्रात कमालीचा उष्मा जाणवला.

बीड सरकार



## संपादकीय

# मराठवाड्यात 'ट्युशन इंडस्ट्री' फोफावली!

ट्युशनविना देदीप्यमान यश! मराठवाड्यात असलेल्या अशा परिस्थितीतही ट्युशन न लावता देशातील सर्वात महत्त्वाची समजली जाणारी व 'आयआयटी'ला प्रवेश देणारी पहिली पायरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जेईई अॅडव्हान्स परीक्षेत नांदेड व परभणी जिल्ह्यँतील विद्यार्थ्यांनी कुठलीही शिकवणी न लावता भर भक्कम गुण मिळविले आहेत. कुठलीही ट्युशन न लावता तुम्हाला देशातील सर्वात मोठे मोठे स्पर्धात्मक परीक्षेतही यश मिळविता येते, असा संदेश त्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या पालकांनी समाजाला दिला आहे. नांदेड येथील अमेय भावसार या विद्यार्थ्याने जेईई मेन्स अॅडव्हान्स परीक्षेत ९८.०६% टाईल तर परभणी येथील हर्षद मुळे या विद्यार्थ्याने ९९.६३ % टाईल एवढे गुण मिळविले आहेत.

राजस्थान, दिल्ली, तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यांत असलेल्या 'ट्युशन इंडस्ट्री'ने मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली, जालना, बीड या जिल्ह्यांत पाय रोवले आहेत. या ठिकाणी वेगवेगळ्या शाखा काढून पालक व विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याचे काम या 'ट्युशन इंडस्ट्री'ने चालविले आहे. यामुळे मात्र महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या रोडावली आहे. महाविद्यालयात 'ट्युशन इंडस्ट्री'ला मदत म्हणून नावापुरतीच उपस्थिती दाखवली जात आहे. डॉक्टर किंवा इंजिनीयर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या प्रमाणात मराठवाड्यात दोन वर्षांसाठी स्थायिक होत आहेत. हे सर्व ठीक असले तरी या प्रकारांमुळे मराठवाड्यात मात्र महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, मुख्य सचिवांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

आपल्या मुलांनी शिकावं व खूप मोठं व्हावं ही प्रत्येक पालकांची इच्छा असते. त्याखातर पालक मुलांच्या शाळा, कॉलेज व ट्युशनच्या शिक्षणासाठी धडपडत असतात. पूर्वीच्या काळात मुलांना ट्युशन लावणे म्हणजे मुलगा 'ढ' आहे, असा समज होता; परंतु आता तो समज पूर्णपणे पुसला गेला आहे. मुलांना ट्युशन असेल तरच तो काहीतरी शिकू शकेल व पुढे जाईल असे चित्र संपूर्ण मराठवाड्यात निर्माण झाले आहे. त्यामुळे देशातील सर्वच प्रकारच्या ट्युशन इंडस्ट्रीने मराठवाड्यात पाय रोवले आहेत; परंतु या ट्युशन इंडस्ट्रीच्या माध्यमातून मराठवाड्यात पालकांची कशाप्रकारे दिशाभूल व आर्थिक फसवणूक होत आहे हे कोणाच्याही लक्षात येत नाही. विशेष म्हणजे या ट्युशन इंडस्ट्रीमुळे राज्यातील सर्वच जिल्ह्यातून मराठवाड्यात ट्युशनसाठी मुले प्रवेश घेत आहेत. यामधून गुन्हेगारी देखील वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. नांदेडमध्ये अलीकडेच एका पर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा दिवसाढवळ्या गर्दीच्या ठिकाणी चाकूने भोसकून खून झाल्याने हे प्रकरण चांगलेच तापले होते. विशेष म्हणजे खून करणारे तीनही आरोपी हे अल्पवयीन म्हणजेच १७ वर्षांचे होते. ते देखील बाहेर गावातील; परंतु ट्युशनच्या निमित्ताने नांदेडमध्ये स्थलांतरित झालेले आहेत.हिंगोलीचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्या संस्थेतील एका मुख्याध्यापकावर दहावीच्या मुलीला पोलीस अॅकॅडमीत भरती करण्याचे आमिष दाखवून अतिप्रसंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. हा प्रकार नांदेड जिल्ह्यातील तामसा पोलीस स्थानक हद्दीत घडला. सदरील मुख्याध्यापक फरार असून पोलीस त्या मुख्याध्यापकाचा शोध घेत आहेत. एकीकडे शिक्षण शिकविण्याच्या नावावर शाळा व महाविद्यालयात शिक्षणाचा बट्ट्याबोळ झालेला दिसून येत आहे.

सध्या बारावीच्या परीक्षांना प्रारंभ झाला असल्याने पर जिल्ह्यातील विद्यार्थी नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली या जिल्ह्यातून परीक्षा देत असल्याचे समोर आले आहे. ट्युशन इंडस्ट्रीने विद्यार्थ्यांना प्रवेश देत असताना त्यांच्या महाविद्यालयाची सोय देखील करून दिलेली आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, नाशिक, चंद्रपूर, नागपूर, गोंदिया अशा वेगवेगळ्या शहरातील विद्यार्थी मराठवाड्यात कोचिंग इंडस्ट्रीमध्ये प्रवेश घेऊन शिकत आहेत. शिक्षणाच्या या पवित्र क्षेत्रात मराठवाड्यात मात्र अलबेल आहे. एकीकडे महाविद्यालयातील प्राध्यापकांना शासनाकडून लाखो रुपयांचा पगार मिळत असताना त्यांचे काम मात्र शून्यावर आले आहे. त्यांचे काम ट्युशन इंडस्ट्री पार पाडत आहे. ही जमेची बाजू म्हणावी की, पालकांसाठी धोक्याची घंटा म्हणावी, असाच प्रश्न उपस्थित होत आहे. नांदेडमध्ये ट्युशनच्या नावाखाली अनेकांनी वेगवेगळे व्यापार थाटले आहेत. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या देखील वाढलेली असल्यामुळे नको ते गैरप्रकार देखील मूळ धरत आहेत.

काही दिवसांपूर्वी नांदेडच्या आनंद नगर चौर रस्त्यावर झालेल्या खून प्रकरणानंतर भाईगिरी तसेच दादागिरी मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे दिसून येत आहे. डॉक्टर व इंजिनीयरचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हजारोंच्या संख्येमध्ये विद्यार्थी व पालक नांदेडमध्ये बस्तान मांडत आहेत; परंतु त्यापैकी केवळ पाच ते सात टक्के विद्यार्थी व पालकांनाच त्यामध्ये यश मिळत आहे. ही टक्केवारी पाहिली तर पालक व विद्यार्थ्यांची या ट्युशन इंडस्ट्रीकडून मोठ्या प्रमाणात दिशाभूल होत असल्याचेही स्पष्ट होत आहे. शेवटी प्रत्येक विद्यार्थी व पालकांना आशा असते. त्यामुळे या आशेवरच ही मंडळी महाराष्ट्राच्या कानाकोपरातून नांदेडमध्ये स्थलांतरित होत आहेत.

# सुट्टीत शिका नवीन गोष्टी



बरीच मुले सुट्टीत हौस, मजा आणि मस्ती करीत सुट्टीची मजा लुटत असतात. आता मात्र ते दिवस राहिले नाहीत. तेव्हा विद्यार्थ्यांच्या जीवनात कोणतीही सुट्टी असो तिचा योग्य प्रकारे उपयोग करून घेतल्यास त्यांना आपल्या जीवनातील दिशा ठरविता येईल. तेव्हा उन्हाळ्याच्या सुट्टीत नवीन काही गोष्टी शिकता येईल का, याचा प्रत्येक विद्यार्थ्यांनी विचार करून नवीन गोष्ट शिकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांना उत्तेजन मिळण्यासाठी थोडक्यात घेतलेला आढावा.

दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे निकाल अजून लागायचे असले तरी शालेय स्तरावरील मुलांचे निकाल लागले आहेत. तेव्हा प्राथमिक व माध्यमिक विभागातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी सुट्टीचा आस्वाद घेताना आपल्या आवडीच्या गोष्टी शिकणे आवश्यक आहे. पूर्वी परीक्षा संपली की, मामाच्या गावी दुसऱ्या दिवशी जात असत. आता फक्त मामाचे गाव नावाला शिल्लक राहिले आहे. जरी मामाच्या गावी गेलो तरी मामाच्या घराचा दरवाजा बंद असून भले-मोठे कुलूप लावलेले दिसते. गावात उदरनिर्वाहाचे साधन नसल्याने पोटापाण्यासाठी गाव सोडावे लागते. सणासुदीच्या दिवशी आपल्याला घर उघडे दिसते. मग जाऊन तरी काय फायदा. तेव्हा इतर ठिकाणी जाणे लोक पसंत करतात.

आता पूर्वीसारखे दिवस राहिले नसले तरी आपल्याला जेव्हा सुट्टी असेल, त्यावेळी नवीन काहीतरी शिकले पाहिजे. तेव्हा अशा मोठ्या उन्हाळी सुट्टीत काही तरी नवीन शिकता येईल का? त्या दृष्टीने मुलांनी स्वत:हून प्रयत्न केले पाहिजेत. महत्त्वाची बाब म्हणजे, आता हीच वेळ आहे, काही तरी नवीन शिकण्याची. एकदा वेळ निघून गेल्यावर पुन्हा वेळ येत नाही. असे असली तरी प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी दररोज इंग्रजी आणि गणित विषयांकडे दुर्लक्ष करू नये. इंग्रजीमुळे मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडत चालल्या आहेत. असे असले तरी आपली मातृभाषा मराठी आहे, हे विसरता कामा नये; परंतु तिचा पाया भक्कम नसल्यामुळे आपण इंग्रजी आणि गणित विषयांकडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे पुढील शिक्षण घेताना अडथळा निर्माण होतो. ग्रामीण भागात सातवीपर्यंत शाळा त्यात पटसंख्या कमी असल्यामुळे दोन शिक्षक. मग सांगा दोन शिक्षक, सात वर्ग, सहा ते दहा विषय आता सांगा कसे शिकविणार इतके विषय सात वर्गांना. इतर शासकीय कामे त्यात शिक्षक सेवक, पोटापुरता पगार नाही, मग सांगा अध्यापन होणार कसे? त्यामुळे तो इतर अवांतर गोष्टींकडे लक्ष देत नाही. याची कल्पना पालक व शाळेत जाणाऱ्या मुलांना सुद्धा असते; परंतु आपण काय बोलणार म्हणून न बोललेले बरे.

अशा परिस्थितीमुळे नवीन गोष्टी काय शिकता येईल, यासाठी मुले व मुलांच्या आई-वडिलांनी एकत्र बसून चर्चा करावी. कारण, नवीन गोष्टी म्हणायला आल्या तरी त्यासाठी पैसा लागतो. याचा ही विचार होणे गरजेचे आहे. परीक्षा संपली म्हणजे आपण मुक्त झालो अशातला भाग नाही, तर त्यानंतर नवीन काय शिकता येईल, त्या दृष्टीने प्रयत्न करायला हवेत. शाळकरी मुलांनी प्रथम आपल्या आवडी-निवडीकडे लक्ष द्यावे. यामध्ये आपल्या आवडीचा छंद कोणता आहे. त्याप्रमाणे शिकता येईल का? असे असले तरी छंद शिकायला काहीच हरकत नाही. मात्र पैसा वाया जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

नवीन कौशल्य आत्मसात करावे, असे प्रत्येकाला वाटत असते. त्याप्रमाणे शिकले पाहिजे. वाद्य वाजवणे, नृत्य करणे, शिवणकाम, मातीची भांडी बनविणे, लाकडी खेळणी तयार करणे, बांबूपासून आयदाने तयार करणे, अशा अनेक गोष्टी शिकता येतील. मात्र त्याकडे एक मजा म्हणून न पाहता त्यातून व्यवसायनिर्मिती कशी करता येईल, त्या दृष्टीने प्रयत्न करायला हवेत. केवळ वेळ वाया घालविण्यासाठी असे काम करू नये. त्यातून काही तरी शिकता येईल, हे भान ठेवावे. जेणेकरून त्यातून रोजगार निर्मिती कशी होईल, हे ध्येय असायला हवे.

जर अशा क्षेत्रात करिअर करायचे असेल, तर अशी पदवी आहे का? कोणत्या ठिकाणी शिक्षण घेता येईल, त्याची चाचपणी करावी. तसेच त्या विषयाचा मार्गदर्शक कोण असेल, त्याला भेटून अचूक ज्ञान घ्यावे. आजही आपल्याला योग्य प्रकारचे मार्गदर्शन न मिळाल्याने आपली आवड असूनसुद्धा त्या विषयात करिअर करू शकत नाही. तसेच विविध स्पर्धात्मक परीक्षा द्यायच्या असतील, तर भविष्याचा विचार करून कोणती परीक्षा उत्तम प्रकारे देऊन उत्तीर्ण होऊ शकतो, यासाठी स्वत: विचार करून स्वत:च निर्णय घ्यायचा असतो. आता आपल्या करिअरच्या दृष्टीने आपल्या आयुष्याला अधिक गती देण्यासाठी वाचन करा म्हणजे चांगले मित्र भेटतील. त्यात आपल्या करिअरलाही नवी दिशा मिळेल. तेव्हा सुट्टीत आपल्या करिअरचा विचार करून आपले पुढील भवितव्य घडवावे. शेवटी आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार असतो, हे विसरता कामा नये. तेव्हा उन्हाळ्याच्या मोठ्या सुट्टीत मुलांनी नवीन गोष्टी शिकायला हव्यात, त्यासुद्धा मुलांनी आपली दूरदृष्टी ठेवून.

# सत्संगतीत राहावे

**अध्यात्म : ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराजर**



नेहमी संतांची संगत करावी. परमार्थाला संतांचे अधिष्ठान आवश्यक आहे. संत आपल्याजवळच असतात, त्यांना पाहायला कुठे जावे लागत नाही. चित्त शुद्ध नसेल, तर संतांच्या जवळ जाऊन तरी काय उपयोग होणार? त्यांना आपण देहात पाहू नये. संत हे काही देहात नसतात, ते जे काही सांगतात, त्या साधनात ते असतात. आपली विषयलालसा सोडल्याशिवाय त्यांची भेट होणे शक्य नाही. संताकडे एखादा चोर गेला, तर त्याला त्याची खरी भेट होईल का? तो ज्या हेतूने जातो त्या हेतूने त्याला फार तर तिथे चोरी करता येईल; परंतु संतांपासून जे खरे मिळवायचे ते साधेल का? आपण जर चित्त शुद्ध करून गेलो, तर आपल्याला त्यांची भेट होते आणि भेट झाल्यावर, जे त्रिभुवनातही मिळणार नाही ते ते देतात. एकजण एका संताकडे नेहमी दर्शनाला येत असे.तिथे इतर मंडळीही पुष्कळ असत. पण तो कुणाशीही बोलत नसे, कुणी काही विचारले, तर उत्तर देत नसे, सदा मुद्रा खिन्न असे. कुणालाही त्याच्याशी बोलावे, असे वाटत नसे. असे काही दिवस गेले. पुढे एके दिवशी ते सद्गुरू म्हणाले, माझा तो वेडा कुठे आहे? तो आज का आला नाही? हे त्याने ऐकताच तो आनंदाने उड्या मारू लागला आणि जो तिथून निघाला, तो पुन्हा आलाच नाही! तो कशाला येईल? गुरूने एकदा आपल्याला 'आपले' म्हणावे हेच शिष्याला मिळवायचे असते. ते त्या गृहस्थाने ओळखले आणि म्हणून त्याचे काम झाले. गुरू तुम्हाला 'तुम्ही माझे झाला' असे म्हणत असतानासुद्धा तुम्ही ते ओळखत नाही, कारण तुम्ही विषय बरोबर घेऊन आलेले असता आणि विषयाची प्राप्ती व्हावी, असा हेतू मनात असतो. याउलट गुरू तुम्हाला निवृत्ती देतात. निवृत्ती दिल्यावर विषयाची प्राप्ती व्हावी ही आठवणच जाते. जसे तहान लागल्यावर पाणी हवेसे वाटते. पण तेच पाणी पोटभर प्यायल्यावर नकोसे वाटते म्हणजे त्याची निवृत्ती होते. आपला यावर आज विश्वास बसायचा नाही. पण हा विश्वास बसायला भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे. नामाने ते कार्य होते म्हणून नामस्मरण करीत जावे.

नामाने काळजी वाटणे नाहीसे होते आणि मग तळमळही आपोआप जाते. मन आपल्याला विषयाचा आहेर करीत असताना आपण त्याला नामाचा आहेर करावा. आपण आपल्या अंत:करणाला नामाची धग लावावी, त्याने अंतःकरण उकळले की दोष वर येतील. ते काढून टाकले की अंतःकरण शुद्ध होईल. शुद्ध अंतःकरण ठेवून नाम घेतले, तर भगवंताच्या कृपेचा अनुभव येईल. नामानेच अंतरंग शुद्ध बनते. नामानेच मन अंतरात प्रवेश करून स्थिर बनते. संत सांगतील तेच करणे हीच त्यांची खरी सेवा होते.

## थोर तुझे उपकार आई! थोर तुझे उपकार



थोर तुझे उपकार  
आई ! थोर तुझे उपकार ।। ध्रु ।।  
वदत विनोदें हांसत सोडी  
कोण दुधाची धार ।। १ ।।  
नीज न आली तर गीत म्हणे  
प्रेम जिचें अनिवार ।। २ ।।

येई दुखणे तेव्हां मजला  
कोण करी उपचार ।। ३ ।।

कोण कड़ेवर घेउनि फिरवी  
चित्ती लोभ अपार ।। ४ ।।

बाळक दुर्बळ होतों तेव्हां  
रक्षण केले फार ।। ५ ।।

त्वांचि शिकविले वाढविले त्वां  
आहे मजवर भार ।। ६ ।।

स्मरण तुझ्या या दृढ़ ममतेचें  
होंते वारंवार ।। ७ ।।

नित्य करावे साह्य तुला मीं  
हा माझा अधिकार ।। ८ ।।  
**- भास्कर दामोदर पाळंदे**

## झेंडूचे फूल दूर करेल कोंडा सोपी पद्धत जाणून घ्या

झेंडूच्या फुलांचा वापर घरे आणि मंदिरांच्या सजावटीसाठी केला जातो. आयुर्वेदातही याचा वापर केला जातो, कारण त्यात अनेक प्रकारचे औषधी गुणधर्म आढळतात. पण, तुम्हाला माहित आहे का की झेंडूच्या फुलाचा वापर कोंडा दूर करण्यासाठीही केला जातो. बदलत्या ऋतूमध्ये कोंड्याच्या समस्येने त्रस्त असाल आणि जास्त पैसे खर्च न करता यापासून सुटका हवी असेल तर तुम्ही झेंडूच्या फुलांचाही वापर करू शकता.



बदलत्या ऋतूत कोंड्याची समस्या समोर येते. ज्यापासून सुटका मिळवण्यासाठी लोक पार्लरमध्ये हजारो रुपये खर्च करतात, पण तरीही समस्या सुटत नाही. आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की कोंडा दूर करण्यासाठी झेंडूच्या फुलाचा वापर करा, ज्यामुळे तुमचा जास्त पैसा खर्च होणार नाही आणि ही समस्याही दूर होईल.

**कसे कराल -** केसांमधील कोंड्याची समस्या दूर करण्यासाठी, सर्वप्रथम झेंडूची काही फुले नीट धुवा. यानंतर, त्याच्या पाकळ्या काढून पुन्हा एकदा धुवा. नीट तपासा की त्यात कीटक नाहीत.

आता गॅसवर पॅनमध्ये दीड ग्लास पाणी टाकून उकळून घ्या. पाणी उकळल्यानंतर त्यात झेंडूच्या पाकळ्या टाकून त्याचे झाकण बंद करा. पाणी अर्धे होईपर्यंत उकळू द्या. पाणी अर्धे झाल्यावर थंड करून स्प्रे बाटलीत भरा. तुम्ही ते दोन आठवडे साठवून ठेवू शकता.

**अशा प्रकारे वापरा -** वापरण्यासाठी, प्रथम केसांचे छोटे विभाजन करा. आता त्यांच्यावर फवारणी करत रहा. ही फवारणी विशेषतः मुळांवर करा. त्याचा परिणाम तुम्हाला काही वेळातच दिसेल.

**झेंडूच्या फुलांचे फायदे-** झेंडूच्या फुलांचा वापर केल्याने केसांमधील कोंड्याची समस्या लवकर दूर होईल. याचा वापर केल्याने केसांना चमक येईल. याच्या वापराने केसांची वाढही होते.

# मुंडावळ आणि त्यातील विविध प्रकार

महाराष्ट्रीन लग्नातील सर्व विधी सुंदर असतात. लग्नाचा दिवस वधू-वर आणि कुटुंबीयांसाठी महत्त्वपूर्ण आणि आनंदाचा असतो. लग्नाची लगबग आणि तयारी करता करता कधी लग्नाचा दिवस उजाडतो हे कळत नाही. अगदी लग्नाच्या दिवसांपर्यंत काही ना काही छोटी खरेदी प्रत्येक घरात सुरूच असते. महाराष्ट्रीन लग्नात आवर्जून लागणारी आणि वधू-वराचं सौंदर्य वाढवणारी गोष्ट म्हणजे मुंडावळ किंवा मुंडावळी.

महाराष्ट्रीन लग्नात मस्ट असणार्या मुंडावळ्यांमधील भरपूर प्रकार आता बाजारात मिळतात. महाराष्ट्रातील काही भागात मुंडावळ्यांऐवजी बाशिंगही बांधलं जातं. कारण मुंडावळ्यांशिवाय वधू-वरांचा लूक अपूर्ण आहे. लग्नाच्या विधींमध्ये मुंडावळ बांधण्याचा खास विधी असतो. लग्नाआधी ग्रहमखालाही वधू आणि वराला मुंडावळ बांधल्या जातात. महाराष्ट्रातील काही ठिकाणी हळदीच्या वेळी मुंडावळ बांधण्यात येतात. पाहू मुंडावळ्यांचे विविध प्रकार.

**पारंपरिक फुल मुंडावळ्या :** लग्नाविधींमध्ये हमखास फुलांच्या मुंडावळी किंवा मुंडावळ वर-वधूंना बांधल्या जातात. यामध्येही आजकाल भरपूर व्हरायटी पाहायला मिळते. ज्यामध्ये मोगरा, निशिगंधा, झेंडू आणि अष्टर फुलंही वापरली जातात. सध्या गुलाबाच्या पाकळ्यांच्या मुंडावळ्यांना जास्त मागणी आहे. महाराष्ट्रात काही ठिकाणी रूईच्या फुलांच्या मुंडावळ्याही बांधल्या जातात.

**मोत्याच्या मुंडावळ्या :** मोती या प्रकारात मिळणार्या मुंडावळ्यांमध्ये वर सांगितल्याप्रमाणे अगदी २० रूपयांच्या साध्या मुंडावळ्यांपासून ते अगदी ठुशीसारख्या डिझाईनच्या हजार रूपयांपर्यंतच्या मुंडावळ्याही मिळतात.

**सोन्या-चांदीच्या मुंडावळ्या :** गेल्या ५-६ वर्षांपासून लग्नात चांदीच्या मोत्यांच्या सोन्याचं पाणी चढवलेल्या मुंडावळ्या किंवा १ ग्रॅम सोनच्या मुंडावळ्याही बर्याच लग्नात तुम्ही वधूवरांना घातलेल्या पाहिल्या असतील.



**बाशिंग :** महाराष्ट्रातील मराठवाडा आणि काही इतर भागात मुंडावळ्यांऐवजी बाशिंग बांधलं जातं. आजकाल बाशिंगमध्ये आता भरपूर व्हरायटी उपलब्ध आहे. **डिझायनर मुंडावळ्या :** मुंडावळ्यांमध्येही आता विविध डिझाईन्सच्या डिझायनर मुंडावळ्या तुम्हाला बाजारात मिळतात. तुम्ही अगदी तुमच्या आवडीप्रमाणे कस्टमाईज्ड मुंडावळ्याही बनवून घेऊ शकता.

# तणावामुळे अस्वस्थ वाटत असेल तर फक्त तुमच्या सवयी बदला


आजच्या काळात प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात तणाव इतका वाढला आहे की इच्छा असूनही त्यापासून पूर्णपणे दूर राहता येत नाही. कधी ऑफिस तर कधी घरच्या जबाबदाऱ्यांमुळे तर कधी अभ्यास आणि करिअरच्या टेन्शनमुळे व्यक्ती स्वतःला तणावाखाली अनुभवते. काही प्रमाणात तणाव असणे सामान्य आहे, परंतु जेव्हा तणाव खूप वाढतो तेव्हा त्याचा परिणाम व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होतो.

सहसा, जेव्हा लोक तणावाखाली असतात तेव्हा त्यांचा स्वभाव देखील चिडचिड होतो आणि अशा परिस्थितीत त्यांच्या नातेसंबंधांवरही परिणाम होतो. असे होऊ शकते की ताणतणाव तुमच्या जीवनावर वर्चस्व गाजवू लागला आहे आणि अशा परिस्थितीत तुम्हाला परिस्थिती हाताळणे खूप कठीण होत आहे.

या परिस्थितीत सर्वोत्तम उपाय म्हणजे काही वाईट सवयी सोडून देणे आणि आपल्या जीवनात चांगल्या सवयी अंगीकारणे. तर आज या लेखात आम्ही तुम्हाला अशाच काही सवयींबद्दल सांगत आहोत, ज्या तत्काळ तणाव दूर करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात-

**शारीरिक हालचाल :-** लोकांना असे वाटते की शारीरिकरित्या सक्रिय राहणे हा शरीराचे वजन राखण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. पण प्रत्यक्षात त्याचा तुमच्या मूडवरही परिणाम होतो. वास्तविक, जेव्हा आपण आपल्या शरीराची हालचाल करतो तेव्हा अशा प्रकारे एंडोर्फिन सोडले जातात.

जे तुम्हाला तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते आणि तणाव देखील कमी करते. येथे तुम्हाला हे देखील समजून घेणे आवश्यक आहे की




शरीर हलविणे म्हणजे दररोज व्यायाम करणे नाही. याचा अर्थ असा असू शकतो की फिरायला जाणे, हलके स्ट्रेचिंग करणे, किंवा नृत्यासारख्या तुमच्या आवडीच्या क्रियाकलापात गुंतणे.

**आपल्या भावनांचे नियमन करा :** बहुतेक लोक तणावग्रस्त देखील असतात कारण त्यांना त्यांच्या भावनांबद्दल बोलण्यास सोयीस्कर वाटत नाही. खरं तर, जेव्हा तुम्ही स्वतःला व्यक्त करत नाही, तेव्हा ते तुम्हाला जास्त ओझं वाटतं.

त्यामुळे तुम्ही खूप तणावाखाली असाल तर तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा. यासाठी तुम्ही तुमच्या भावना कोणाशीही शेअर करू शकता किंवा डायरी लिहिण्याची सवयही लावू शकता. एकदा लिहून तुम्हाला खूप रिलॅक्स वाटेल.

**कॅफिनचे सेवन कमी करा :** जर तुम्हाला जास्त ताणतणाव वाटत नसेल तर तुम्ही तुमचे कॅफिनचे सेवन कमी करू शकता. खरं तर, जर तुम्ही कॅफीनचे सेवन संध्याकाळी उशिरा करत असाल तर त्यामुळे तुम्हाला रात्री झोपेचा त्रास होऊ शकतो. याशिवाय कॅफीन तुमच्या शरीराला डिहायड्रेट करते. म्हणून कॅफिनचे सेवन कमी प्रमाणात करण्याचा प्रयत्न करा. त्याच वेळी, आपण कॅफिनऐवजी नारळ पाणी किंवा लिंबूपाणी देखील घेऊ शकता.

**पुरेशी झोप घ्या :** चांगली झोप घेणे हा तणाव कमी करण्याचा एक उत्तम मार्ग आहे. स्लीप फाउंडेशनच्या मते, १८-६४ वयोगटातील प्रौढांनी प्रत्येक रात्री ७-९ तासांची झोप घेतली पाहिजे. झोपेचा आपल्या शरीराच्या प्रत्येक भागावर परिणाम होतो, आपल्या मेंदूपासून दिवसभरातील आपल्या उर्जेच्या पातळीपर्यंत. जेव्हा एखाद्या व्यक्तीला पुरेशी झोप मिळत नाही तेव्हा त्याचा स्वभाव थोडा चिडचिड होतो आणि तो स्वतःच जास्त तणावग्रस्त होतो असे दिसून येते. म्हणून, रात्री चांगली झोप घेण्याचा प्रयत्न करा आणि स्वतःला आनंदी ठेवा. त्यामुळे आता तणावाचा तुमच्या जीवनावर परिणाम होऊ देऊ नका. फक्त या सवयींचा अवलंब करा आणि तुमचे जीवन आनंदी बनवा.

# विशेष वृत्त

## शेतकरी वर्गाने विविध योजनेसाठी फॉर्मर आयडी ओळखपत्र तात्काळ काढावे : अनिल बोर्डे

**गेवराई (प्रतिनिधी):** जिल्ह्यातील सर्व शेतकरी वर्गांना विनंती करण्यात येते की, शासनाच्या विविध योजनेसाठी प्रत्येक शेतकरी वर्गाकडे फॉर्मर आयडी ओळखपत्र काढणे अनिवार्य आहे तरी नजीकच्या सरकार सेवा केंद्र, महा सेवा केंद्र येथे तात्काळ संपर्क साधून ग्री स्टॅक फार्मर आयडी ओळखपत्र काढून घ्यावे असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष तथा गेवराई ग्राहक पंचायत मार्गदर्शन केंद्रप्रमुख अनिल बोर्डे यांनी या पत्रकार द्वारे करण्यात येत आहे. यापुढील काळात शासनाच्या विविध लाभदायक सेवा पीएम किसान योजना, पिक विमा, नैसर्गिक आपत्ती अनुदान, पिक कर्ज, व इतर शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय नोंदणी न केल्यास शेतकऱ्यांना कुठल्याही योजनेचा लाभ मिळणार नाही याची सर्वांनी नोंद घेणे आवश्यक आहे.शेतकरी ओळख क्रमांक( फॉर्मर आयडी) ओळखपत्र काढण्यासाठी आधार कार्ड, आणि मोबाईल क्रमांक तसेच शेतीचा गट नंबर माहित असणे आवश्यक आहे. तरी सर्व बंधू भगिनींना या जाहीर प्रकटनाद्वारे विनंती की, आपले फॉर्मर आयडी कार्ड तात्काळ काढून घ्यावे असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केले आहे.

## अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत कुंभारवाडीचे कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल

**गेवराई (प्रतिनिधी):** गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे कुंभारवाडी येथील भाजपा आणि सेनेच्या असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे स्वागत केले.कुंभारवाडी येथील ग्रामपंचायत सदस्य अर्जुन धनवडे यांच्यासह युवराज आटपळे, शरद शिंदे, रणजित जाधव बाळू भांडवले यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे स्वागत करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी

चांगदेव जाधव, सखाराम जाधव, लाला जाधव, नितिन जाधव, बदाम जाधव, बाजीराव शिंदे, प्रमोद जाधव, गणेश जाधव, मारुती भटे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभहवाय?, ई केवायसी पुर्ण करा

**बीड :** प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत पात्र कुटुंबाची आवास प्लस २०२४ सर्वेक्षण उपमहा निदेशक, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.४ एप्रिल २०२५ रोजीच्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये आवास प्लस २०२४ सर्वेक्षण करताना अनेक बाबींच्या अंमलबजावणीसाठी सूचना दिल्या आहेत. सर्व १०० टक्के ग्रामपंचायत यांना सर्वेक्षकाचे मॅपिंग करून त्याची ई केवायसी १०० टक्के पूर्ण करणे, स्वः सर्वेक्षणाबाबत ग्रामपंचायत स्तरावर येथोचित जनजागृती करणे, आवास प्लस २०२४ सर्वेक्षण पूर्ण करतांना तालुकास्तरावरून किमान १० टक्के तपासणी करण्यासाठी तपासणीम्हणून तालुक्यामध्ये कार्यरत विस्तार अधिकारी प्रर्यवेशक/प्रर्यवेशिका, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कनिष्ठ अभियंता, निवडलेला तपासणीस सर्वेक्षक नसावा याची दक्षता घेणे. निवडलेल्या तपासणी यांना किमान १० टक्के सर्वेक्षित कुटूंबे तपासण्यासाठी तालुक्यातील ग्रामपंचायत वितरण करुन त्या ग्रामपंचायतींना त्याचे मॅपिंग करुन घेणे त्यांची ई-केवायसी पूर्ण करणे. सर्वेक्षण केलेल्या कुटुंबाची माहिती केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या परवानगीशिवाय कोठेही प्रकाशित न करणे. दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करून सर्वेक्षणाची कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण करावी, अशा सूचना संचालक ग्रामीण गृहनिर्माण महाराष्ट्र राज्य यांनी दिल्या आहेत.

## महाराष्ट्र गौरव यात्रेच्या स्वागतासाठी गेवराई सज्ज

**गेवराई:** महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र गौरव रथयात्रेचे महाराष्ट्रभर आयोजन केले आहे. मराठवाडा विभागाच्या रथयात्रेचे बुधवार, दि.३० एप्रिल रोजी दुपारी ३.३० वाजता गेवराई शहरातील पंचायत समिती कॉर्नर येथे आगमन होणार आहे. याप्रसंगी गेवराईच्या पावन भुमीतील माती गोदावरी व सिंदफणा नदीचे पवित्र जल संकलित करून कलश पुजन केले जाणार आहे. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. राष्ट्रवादीच्या महाराष्ट्र गौरव यात्रेच्या स्वागतासाठी गेवराई शहर सज्ज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने राज्यभर महाराष्ट्र गौरव यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र गौरव रथयात्रा सुरु असून मराठवाड्यातील रथयात्रेचे दि.३० एप्रिल रोजी बीड जिल्ह्यात आगमन होणार आहे.

## पशुसंवर्धन विभागाच्या वतीने २ मे रोजी कार्यशाळा

**बीड :** राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा दि.२ मे रोजी स्व. गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर परळी वै. येथे सकाळी ९ ते सायं. ५ वाजेपर्यंत पंकजा गोपीनाथराव मुंडे, मंत्री पशुसंवर्धन पर्यावरण व वातावरणीय बदल यांच्या उपस्थितीमध्ये करण्याचे नियोजन आहे. या कार्यक्रमास बीड जिल्हयातील बँकेचे प्रतिनिधी, पशुपालक, शेतकरी यांच्यात थेट चर्चा आयोजित केलेली आहे. तरी बीड जिल्हयातील जास्तीत जास्त पशुपालक, शेतकरी यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन पशुसंवर्धन विभाग बीड यांच्या मार्फत करण्यात आलेले आहे. तसेच प्रस्तुत कार्यक्रमास जिल्हयातील काही निवडक बँक अधिकारी व प्रगतीशिल पशुपालक यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

# भगवान परशुराम जयंती निमित्त पसायदानच्या चिकुमल्यांना आमरस

### अक्षय तृतीयेच्या पुर्वसंध्येला परशुराम संस्कार सेवा संघाचा आदर्श उपक्रम






**बीड (प्रतिनिधी):** वंचीत मुलांचे हक्काचे घर असलेल्या पसायदान सेवा प्रकल्प येथे भगवान परशुराम जयंती निमित्त चिमुकल्या वंचित मुलांना पुरणपोळी आणि आमरसाचे जेवन देण्यात आले. अक्षय तृतीयेच्या पुर्व संध्येला राबवलेल्या या आदर्श उपक्रमाचे कैतुक होत आहे.

येथील परशुराम संस्कार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष गजानन जोशी आणि प्रदेशाध्यक्ष श्री.बाळासाहेब थिगळे हे प्रत्येक वर्षी भगवान परशुराम जयंती सामाजिक, समाजाभिमुख उपक्रमाने साजरी करतात. यावर्षी अनाथ, निराधार, वंचित आणि उपेक्षित मुलांचे पालन,पोषण आणि संगोपन करणाऱ्या पसायदान सेवा प्रकल्प येथे भगवान परशुराम यांची जयंती आगळ्या-वेगळ्या उपक्रमाने साजरी करण्यात आली. जयंतीचे औचित्य साधून अक्षय तृतीयेच्या पूर्व संध्येला पसायदान सेवा प्रकल्पातील ८० हून अधिक वंचित मुलांना पुरणपोळी आणि आमरसाचे सुंदर जेवण देण्यात आले. वंचित मुलांनी आनंदाने आमरस आणि पुरणपोळीचा आस्वाद घेतला. यावेळी पसायदान सेवा प्रकल्पाचे गोवर्धन दराडे, सौ.रंजनाताई दराडे उपस्थित होते. यावेळी रोहन दराडे यांनी परशुराम संस्कार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष गजानन जोशी, प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थिगळे यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. वंचित मुलांना पुरणपोळी आणि आमरास हा मिष्ठान्नाचे भोजन दिल्या बद्दल आभार व्यक्त केले. यावेळी परशुराम संस्कार सेवा संघाचे संजयराव कुलकर्णी, बाबा पाठक, सौ.मंगलताई आगवान,सौ.सुषमाताई थिगळे,सौ.आर्चनाताई जोशी, सौ.अमृताताई जोशी, राणी कुलकर्णी, श्रीमती मंगलताई केंडे, विनायकराव देशमुख, ॲड.अक्षय भालेराव, प्रसाद कुलकर्णी, दिनकर कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष मुकूंद खडकीकर, चंद्रकांतराव जोशी, रविंद्र कुलकर्णी आदींची उपस्थिती होती.

**नाहक खर्चाला फाटा देवून वंचित मुलांचे केले तोंड गोड..**

**भगवान परशुराम यांच्या सारख्या शौर्य आणि धर्मरक्षकाच्या जयंती निमित्त नाहक खर्चाला फाटा देत वंचित, उपेक्षित आणि निराधार असलेल्या पसायदान सेवा प्रकल्पातील बालकांना आमरस आणि पुरणपोळीचे भोजन देण्याचा उपक्रम आदर्श आणि स्तुत्य आहे. यामुळे परशुराम संस्कार सेवा संघाचे कौतुक होत आहे.**




## पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

### देशातील सामाजिक सलोखा अबाधित राखण्याचे आवाहन

**माजलगाव (प्रतिनिधी):** देशातील जम्मू आणि काश्मीर मधील पहलगाम अतिशय सुंदर पर्यटन स्थळ असून, काही दिवसांपूर्वी येथील पर्यटकांवर दहशदवादी हल्ला झाला. यावेळी या हल्ल्यात तब्बल २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. सदरील दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालेल्या भारतीयांना श्रद्धांजली अर्पण पर कार्यक्रम काँग्रेसचे जेष्ठ विचारवंत हरिभाऊ सोळंके यांच्या पुढाकारातून शहरातील ठक्कर बाजार येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सदरील कार्यक्रमात चळवळीतील जेष्ठ नेते कॉ. मुसद्दीक बाबा सर, जेष्ठ नेते दयानंद स्वामी, जेष्ठ नेते बाबुराव पोटभरे, आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद यादव, राष्ट्रीय काँग्रेसचे नारायण होके, राष्ट्रीय काँग्रेसचे दत्ता कांबळे, मनोहर डाके, ऍड. याकूब मेमन,अभय होके, धम्माणंद साळवे,श्रीहरी मोरे, रशीद शेख, अफरोज तांबोळी सह सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्वपक्षीय नेत्यांच्या भाषणातून सदरील हल्ल्याचा सामना करण्यासाठी प्रथम आणि शेवटी भारतीय म्हणून आपण देशातील सरकार सोबत ठाम पणे उभा असून, भारत सरकारने जशाच तसे उत्तर द्यावे तसेच देशातील सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी भारत सरकार सह देशातील प्रत्येक नागरिकांनी सहकार्य करावे असे एकमुखी आवाहन यावेळी उपस्तित सर्वपक्षीय नेत्यांनी यावेळी केले आहे.

## उमापूर येथे खाजगी रूग्णालयावर दगडफेक

**गेवराई (प्रतिनिधी):** तालुक्यातील ऊमापुर येथील माऊली क्लिनिकवर सोमवारी रात्री ११ ते ११:३० च्या सुमारास मद्यधुंद अवस्थेतील गावगुंडांनी हल्ला चढवून दहशत माजवली. यावेळी क्लिनिकचे संचालक डॉ. अमोल पवार, त्यांचे बंधू आणि कर्मचाऱ्यांना शिवीगाळ व मारहाण करण्यात आली, तसेच दवाखान्याची तोडफोड करून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण केले. या घटनेमुळे रात्रीच्या वेळीही रुग्णसेवा देणारे डॉ. पवार कुटुंबाचे मानसिक धैर्य खचले असून, त्यांच्या कुटुंबीयांना गावगुंडांकडून शिवीगाळ व धमक्या देण्यात आल्या. प्राप्त माहितीनुसार, सोमवारी रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास काही गावगुंड रुग्ण घेऊन माऊली क्लिनिकवर आले. डॉ. पवार तातडीने खाली येत नसल्याचा राग आल्याने अवघ्या दोन-तीन मिनिटांतच या गुंडांनी प्रथम क्लिनिकमधील केमिस्टला शिवीगाळ आणि मारहाण सुरू केली. डॉ. पवार खाली येताच त्यांना आणि त्यांच्या बंधूंवर हल्ला चढवण्यात आला. यावेळी गुंडांनी दवाखान्याच्या साहित्याची तोडफोड करून परिसरात दहशत माजवली. या घटनेचा गेवराई तालुका डॉक्टर्स असोसिएशनने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. असोसिएशनच्या वतीने गेवराई पोलीस निरीक्षकांना निवेदन देऊन दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. या वेळी निवेदन देतांना ज्येष्ठ डॉ. मुदकोंडवार, बालरोगतज्ज्ञ डॉ. सराफ, डॉ. भुतडा, डॉ. जिवन राठोड, डॉ. अनिल फडके, डॉ. नरसाळे, डॉ. दहीफळे, डॉ. अभिजीत येवले, डॉ. प्रसाद येवले, डॉ. भगवान आतकरे, डॉ. भगवान जाधव, डॉ. विशाल काकडे, डॉ. गणेश काकडे, डॉ. संभाजी पवार, डॉ. विशाल पवार, डॉ. दामोधर कुटे, डॉ. आदित्य जरांगे, डॉ. शिवाजी पंडित, डॉ. शेषराज मोटे, डॉ. तळतकर, डॉ. गौतम वाघमोडे, डॉ. अभिनव मुळे, डॉ. राम धुमक, डॉ. भारत नागरे, डॉ. बेलगुडे, डॉ. तानाजी पाटील यांच्यासह अनेक डॉक्टर उपस्थित होते. गेवराई तालुका डॉक्टर्स असोसिएशनने या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध करताना म्हटले आहे,

## डॉ. ऋषीकेश आंधळे यांना लिंबागणेश येथे पदस्थापना

**बीड (प्रतिनिधी):** सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत लिबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून खंडाळा येथील डॉ. ऋषिकेश सर्जेराव आंधळे रुजू झाले आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ अंतर्गातील, वैद्यकीय अधिकारी गट-अ म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र लिंबागणेश (ता. बीड) येथे पदस्थापना मिळाली आहे. लिंबागणेश आरोग्य केंद्रात कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी नव्हते आता कायमस्वरूपी अधिकारी मिळाले असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. डॉ. ऋषिकेश आंधळे यांची वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल सरपंच रतन जायभाये, उपसरपंच शेषराव आंधळे, श्रीमंत जायभाये, दुध संघाचे चेअरमन लाला पाटील चौरे, सुभाष चौरे, गुंडीबा चौरे, गोविंद चौरे, सर्जेराव आंधळे यांनी अभिनंदन केले.

# न्यायालयाच्या आदेशानंतरहीशेतकऱ्यांना मिळेना न्याय!

### भूसंपादन न करताच शेतकऱ्यांच्या शेतातून महामार्गाची झाली निर्मिती

### तांदळा येथील संतप्त शेतकरी १ मे महाराष्ट्रदिनी करणार सामुहिक आत्मदहन

**गेवराई (प्रतिनिधी):** जुना रस्ता वेगळ्या ठिकाणाहून असताना कल्याण-विशाखापट्टणम या महामार्गाची गेवराई तालुक्यातील तांदळा याठिकाणी दुसरीकडूनच शेतकऱ्यांच्या शेतात निर्मिती करण्यात आली. यावेळी संबंधित विभागाकडून शेतकऱ्यांच्या जमिनीचे कोणतेही भूसंपादन करण्यात आलेले नाही, तसेच मावेजा देखील शेतकऱ्यांना मिळालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीतून अनाधिकृत हा महामार्ग गेला आहे. याबाबत तांदळा येथील शेतकऱ्यांचा मागील आठ वर्षापासून न्यायालयीन लढा सुरु असून याप्रकरणी न्यायालयाच्या देखील संबंधित विभागाला महामार्ग गेलेल्या जमीनीचे भूसंपादन करुन संबंधित शेतकऱ्यांना मावेजा करण्याचे आदेश दिलेले आहेत. तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी देखील महामार्ग प्राधिकरण विभागाला कारवाईबाबत सूचना दिलेल्या आहेत. तरी देखील याप्रकरणी कोणतीही कारवाई होत नसल्याने तांदळा येथील शेतकऱ्यांनी १ मे महाराष्ट्रदिनी सामुहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

गेवराई तालुक्यातून कल्याण-विशाखापट्टणम हा राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ गेलेला आहे. दरम्यान तालुक्यातील तांदळा याठिकाणी हा महामार्ग सन १९६१ साली वेगळ्या ठिकाणी असताना तो दुसरीकडून करण्यात आला. याबाबत शिर्डी गावचे भुमीपूत्र तथा शिर्डी संस्थानचे पुजारी दिलीप सुलाखे शास्त्री यांनी आठ वर्षापूर्वी कागदपत्रांसह हा प्रकार समोर आणून सदरील महामार्ग तांदळा याठिकाणी अनाधिकृत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. यासाठी त्यांनी ज्या शेतकऱ्यांच्या जमीन या महामार्गात गेल्या आहेत त्यांना सोबत घेऊन वेळोवेळी आंदोलने केली. तसेच तहसीलदार, जिल्हाधिकारी, महामार्ग प्राधिकरण, विभागीय आयुक्त तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची वेळोवेळी भेट घेऊन अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत मागणी केली. यानंतर मंत्री नितीन गडकरी यांनी महाराष्ट्र राज्य महामार्ग प्राधिकरण विभागाला विशेष लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या सुचना दिल्या होत्या.

तसेच याबाबत दिलीप सुलाखे यांनी न्यायालयात देखील याचिका दाखल केली होती. न्यायालयाने देखील तांदळा येथील शेतकऱ्यांच्या जमिनीतून अनाधिकृत महामार्ग झाल्याचे नोंदवून संबंधितांना भूसंपादन करुन मावेजा देण्याचे आदेश दिले होते. यानंतर संबंधित शेतकऱ्यांनी न्यायालयाच्या आदेशानुसार भुमीअभिलेख कार्यालयात रितसर मोजणी फी भरुन मोजणी केली. मात्र यानंतर प्रशासकीय पातळीवर याप्रकरणी उदासीनता दिसून येत आहे. अनाधिकृत महामार्गात सन १९६१ पासून जमीनी गेलेल्या असताना, तसेच न्यायालयाचे आदेश असताना देखील मावेजासाठी कारवाई होत नसल्याने तांदळा येथील संबंधित शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे. दरम्यान न्याय मिळत नसल्याने या शेतकऱ्यांनी आता १ मे महाराष्ट्र दिनी सामुहिक आत्मदहन करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, जिल्हाधिकारी तसेच महामार्ग प्राधिकरण विभागाला दिले आहे.

# बीडमध्ये दोन मोबाईल चोर पकडले, दोन लाख ८७ हजाराचा मुद्देमाल जप्त

## बीड बसस्थानकातील चोऱ्याकडे स्थानिक गुन्हे शाखेचे जाणून बुजून दुर्लक्ष

बीड (सरकार)शहरात मोबाईल चोरीचे प्रमाण वाढल्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक नवनित कॉवत यांच्या आदेशवरून स्थाक गुन्या शाखा खडबडून जागी झाली असुन मोबाईल चोरी च्या गुन्हा तील दोन आरोपिना मद्देमालासह अटक केली १० मोबाइल सह दोन लाख ८७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

फिर्यादी अभिषेक दिनकर केदार वय २० व्य.शिक्षण रा.संतज्ञानेश्वर नगर यांनी पो.स्टे.शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, दि.११ एप्रिल २०२५ रोजी रात्री ०९.१५ वा. सुमारास पिंपरगव्हाण रोड, गायत्री दुकानाच्या जवळ रोडवरुन घरी फोनवर मित्राला बोलत चालत जात असतांना पाठीमागुन काळया रंगाच्या स्प्लेंडर मोटार सायकलवर तिघेजण आले व त्यातील एका अज्ञात इसमाने माझा मोबाईल हिसकावुन घेवुन ते तिघे तेथुन निघुन गेले. वगैरे फिर्याद वरुन पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे गु.र.नं.२१०/२०२५ कलम ३०९(४),३(५) भा.न्या.सं.२०२३ अन्वये गुन्हयाची दि.१२ एप्रिल २०२५ रोजी नोंद करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा उकल करण्याचे दृष्टीकोणातुन मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेश दिले. त्यावरुन पो.नि. स्था.गुशा.बीड यांनी आपले अधिपत्याखालील पोउपनि सुशांत सुतळे व त्यांचे पथकाला गुन्हयाचे उघडकीस आणण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले. पोउपनि सुशांत सुतळे यांनी त्यांची गोपनिय यंत्रणा सतर्क करुन दिनांक २८/०४/२०२५ रोजी स्थागुशा पथकाला गोपनिय माहिती मिळाली की, दोन इसम हे बीड शहरातुन वेगवेगळया ठिकाणाहुन मोबाईल



हिसकावुन चोरुन नेलेले मोबाईल विकणेकामी समर्थ मंगल कार्यालय समोर ते अहिल्यानगर जाणाऱ्या रोडवर येणार असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली तेव्हा सदर माहिती पो.नि. स्था.गु.शा. यांना देवुन त्यांनी तत्काळ पुढील कारवाई करणेचे आदेश दिल्याने स्थागुशा पथक बातमी ठिकाणी जावुन तेथे सापळा लावला असता एक मोटार सायकलवर दोन इसम आल्याचे दिसुन आले तेव्हा त्यांचेकडे जात असतांना त्यांनी तेथुन मो.सा.वर पळुन जाण्याचे प्रयत्नात असतांना त्यांना पथकाने पकडुन त्यांची नावे विचारली असता १) आदित्य बंकट नरवडे वय १९ वर्षे रा.बालेपीर ता.जि.बीड, २) नामदेव रामप्रसाद डोईफोडे वय १९ वर्षे रा.ईट ता.जि.बीड असे सांगितले. मोबाईल हिसकावुन चोरी केलेल्या घटनांबाबत बारकाईने विचारपुस केली असता आदित्य नवडे व त्यांचे इतर दोन साथीदार यांनी मिळुन मो.सा.वर जावुन मो.सा.वर जावुन मोबाईल बोलत चालत असलेल्या लोकांचे मोबाईल हिसकावुन चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यांचे ताब्यातुन एकुण १० रिअल मी, सॅमसंग अल्ट्रा, रिअल मी, विवो, ओपो, पो.को. कंपनीचे मोबाईल व गुन्हयात वापरलेली स्प्लेंडर मोटार सायकल असा एकुण २,८७,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन आरोपींकडुन खालील नमुद उकल करण्यात स्था.गु.शा.पथकाला यश आले आहे.

१) पो.स्टे.शिवाजीनगर गुरनं २१०/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं.२) पो.स्टे.शिवाजीनगर गुरनं १६५/२०२५ कलम ३०४(४) भा.न्या.सं.३) पो.स्टे.बीड शहर गुरनं ४०/२०२५ कलम ३०३(२), भा.न्या.सं.४) पो.स्टे.बीड शहर गुरनं ६७/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. सदर गुन्हयात एकुण तीन आरोपी निष्पन्न करण्यात आलेले असुन १) आदित्य बंकट नरवडे रा.बालेपीर व २) नामदेव रामप्रसाद डोईफोडे यांना पो.स्टे.शिवाजीनगर,बीड यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. त्यांचेकडुन मोबाईल चोरीचे आणखीन इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्तता आहे. उर्वरित एक आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक करण्याचे प्रयत्न चालु आहे.

सदरची कामगिरी . नवनित काँवत पोलीस अधीक्षक बीड, . सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे पोह/मारुती कांबळे, पोह/विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, देविदास जमदाडे, पोशि/नारायण कोरडे, अश्विनकुमार सुरवसे, चापोह/नितीन वडमारे यांनी मिळुन केली आहे.

# प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे उपोषण तात्पुरते स्थगित

### युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागरांची मध्यस्थी; ना.अजित पवारांसमोर प्रश्न मांडण्याची ग्वाही

बीड (सरकार)जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक पदवीधर, भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ शिक्षकांनी गणित व विज्ञान विषयांत रूपांतर करण्याच्या मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू होते. उपोषणस्थळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२९) भेट देत शिक्षकांशी संवाद साधला. त्यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.



डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले की, शिक्षकांच्या मागण्या न्याय्य असून त्या शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या जातील. उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यामार्फत शासनदरबारी पाठपुरावा करून या मागण्यांची योग्य ती दखल घेण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून शिक्षकांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर लवकरात लवकर तोडगा काढण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला प्रतिसाद देत, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांच्याद्वारे शिक्षकांना निरोप पाठवला आणि त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. या भेटीदरम्यान आनंद पिंगळे, सुमंत खांडे, विजय खोसे, सुमेध जोगदंड, दिपक घाटे, विकास गवते, दिलीपकुमार सानप, जितेंद्र सांगळे, निलेश चव्हाण यांच्यासह शिक्षक बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, शिक्षकांनी आपल्या मागण्यांकडे शासनाने तत्काळ लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# परळी न्यायालयाच्या नुतन इमारतीचा उद्या कोनशिला समारंभ

परळी (सरकार): परळी वैजनाथ येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नुतन इमारतीचा कोनशिला समारंभ १ मे रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केला आहे.* मुंबई उच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती श्री नितीन भगवंतराव सुर्यवंशी यांच्या शुभहस्ते व पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री माननीय पंकजाताई गोपीनाथराव मुंडे व मुंबई उच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती श्री रविंद्र मधुसुदन जोशी यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड माननीय श्री आनंद लक्ष्मीचंद यावलकर हे भुषवणार आहेत. तरी सदर कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन परळी न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी दिपक रुस्तुमराव बोर्डे व परळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड.हरीभाऊ व्यंकटराव गुट्टे यांनी केले आहे.

# कामगार कर्मचारी शेतकरी मिरवणुकीत सहभागी व्हा-प्रा.सुशीलाताई मोराळे

बीड (सरकार): दिवसेंदिवस कामगार कर्मचारी शिक्षक शेतकरी वंचित उपेक्षित वर्गाचे प्रश्न जटिल होत आहेत गेल्या तीन महिन्यात मराठवाड्यात २५९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत शिक्षण क्षेत्रात रोज नवा जीआर काढून राज्यकर्त्यांनी गोंधळ निर्माण केला आहे. शेतकरी कर्ज माफ करतो म्हणून खोटी आश्वासने देऊन सरकार राज्यात आले मात्र आता शेतकरी कर्ज माफ करता येणार नाही असे जाहीर करून टाकले. लाडकी बहीण योजना गुंडाळण्याची तयारी सुरू आहे जवळपास दहा लाख लाडक्या बहिणींना या ना त्या कारणामुळे लाभ नाकारला आहे.



कामगार म्हणून मान्यता मिळण्यासाठी ग्रामसेवकांचा दाखला मिळत नाही.५२००० शिपाई प्रवर्गाची पदे व्यापगत केली आहेत. नौकऱ्यांचे कंत्राटीकरण सुरू आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास सरकार टाळा-टाळ करत आहे. संघटित शक्ती दाखवून सरकारला वटणीवर आणण्यासाठी सर्व क्षेत्रातील कामगार कर्मचारी शेतकरी कष्टकऱ्यांनी दिनांक १ मे जागतिक कामगार दिनाच्या मिरवणुकीत सहभागी व्हावे असे आव्हान किसान संघर्ष समितीच्या प्रा सुशिलाताई मोराळे यांनी केले आहे. सरकारने जन सुरक्षा कायदा पारित केला आहे हा कायदा लोकशाही मूल्यांची पायमल्ली करणार आहे या कायद्याचा फटका पत्रकारांनाही बसणार आहे. एक एप्रिल २०२५ पर्यंत या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सरकारने हरकती मागवल्या होत्या २९ हजार व्यक्ती व संस्थांनी पक्षांनी या हरकती दिल्या आहेत शेतकऱ्याला हमीभाव मिळत नाही. उत्पादन खर्च आणि बाजारभाव यात तफावत आहे त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे. भांडवलदारांचे लाखो कोटी रुपये कर्ज सरकारने माफ केले मात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास सरकार टाळाटाळ करीत आहे.

# आंबेडकरी विचारधारा तळागाळात पोहचविण्याचे काम युवकांनी करावे:पप्पू कागदे

बीड (सरकार): भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधूता व न्यायावर आधारीत समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी, शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा मुलमंत्र देवून या देशातील तमाम उपेक्षीत समुहातील समाज बांधवांना आपल्या हक्क व अधिकारासाठी आवाज उठविण्याची व लढा उभारण्याची ताकद निर्माण करून दिली. आंबेडकरांना अपेक्षीत असलेली चळवळ गतिमान करण्यासाठी युवकांनी संघटीत होवून आंबेडकरी विचारधारा तळागाळात पोहचविण्याचे काम करावे. असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने बोरफडी, मौज, चऱ्हाटा, नाथापूर, खुडूस या गांवी केले.



पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विषमता, भेदभाव यांच्या विरोधात मुकनायक या वृत्तपत्रातून लेखन करून उपेक्षीतांना समता, शिक्षण, हक्क व आपल्या अधिकारासाठी जागृत करून स्वातंत्र्य मिळवून दिले. आगामी काळात आंबेडकरी विचारधारा तळागाळात पोहचविण्याचे काम युवकांनी करावे. यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, किशोर कांडेकर, शाहु डोळस, सुभाष तांगडे, कैलास घुगे, बाप्पासाहेब घुगे, सुमंत कुटे, भैय्यासाहेब वाघमारे, रेवण कसबे, मायाताई मिसळे, सुंदरराव चव्हाण, सतिष शिंदे, सतिष सिनगारे, राजाभाऊ वक्ते, फुलचंद गारे, मनोज ससाणे, महादेव इंगोले, सुदाम ससाणे, संजय साबळे, भाऊसाहेब दळवी,ज्ञानेश्वर शिंदे, अनिल आरकडे, भैय्या मस्के, रतन वाघमारे, शाम वीर धम्मा पारवेकर, महेश कागदे, आप्पा मिसळे, बाबू मिसळे, प्रकाश मिसळे यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

# बालरंगभूमी परिषदेच्या निवासी कला-संस्कार शिबिराचा बीड जिल्ह्यातील २८ शिबिरार्थी घेणार आनंद

बीड (सरकार); जीवनांत संस्काराचे खूप महत्त्व आहे. संस्काराशिवाय जीवन शून्य असते. संस्कारच मनुष्याला श्रेष्ठ बनवितात, उत्तम आकार देतात, याचाच विचार करुन संस्कारासोबत कलांनी बालकांची सृजनशीलता वाढविण्याकरिता बालरंगभूमी परिषदेतर्फे कोल्हापूर येथील कणेरी मठात निवासी कला-संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील २८ शिबिरार्थी या कला - संस्कार शिबिरात सहभागी होवून सहभोजन, स्वावलंबनाचे धडे गिरवत कला व संस्कारांचा आनंद घेणार आहेत.



सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो. संस्कार संस्कृतीनेच उत्पन्न होतात यासोबतच आपली दिनचर्या नियमित ठेवणे, आहारनियमांचे पूर्ण पालन करणे, या सर्व गोष्टी शारीरिक, मानसिक दृष्टीने खूप जरूरी आहे. सामाजिक स्वास्थ्याकरिताही याची नितांत गरज आहे म्हणूनच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न संस्था बालरंगभूमी परिषदेतर्फे कोल्हापूर येथील कणेरी मठ या निसर्गरम्य ठिकाणी तीन दिवसीय कला-संस्काराचे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या कलासंस्कार शिबिरात सहभागी होणारी शिबिरार्थी मुले निसर्गाचे सान्निध्य, सहभोजन, सहनिवास, स्वयंपूर्ण जीवनशैलीची ओळख व अनुभवातून स्वावलंबन व प्रसंगावधान वाढवणे, भारतीय कला - क्रीडा आणि संस्कृती यांचा हसत खेळत परिचय तसेच श्रवण, मनन, निरीक्षण या कृतीतून ज्ञान देण्यासोबतच योगाभ्यास, रंगमंच खेळ, जुन्या पिढीचे लगोरी, पतंग उडवणे आदी खेळ, चित्रकला, मूर्तीकला, मास्क मेकींग, सर्पांची ओळख, लाठी काठी प्रशिक्षण, पुस्तक अभिवाचन, यासह प्रार्थना, श्लोक, ज्येष्ठ व्यक्तींचा आदर सन्मान याबद्दल कृतीशील कार्यक्रमांचा आनंद घेणार आहेत.

शिबिरार्थी मुलामुलींसोबतच बीड जिल्ह्यातील पालक व शिक्षक या शिबिरात सहभाग घेणार असून, त्यांच्यासाठी बालकांची मानसिकता, आयक्यूसोबतच इक्यू वाढविण्यावर भर, मुलांचे भावविश्व, त्यांचा सामाजिक व शैक्षणिक विकास यावर पालकांच्या कृतीरुप विविध कार्यशाळा व विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे बाल रंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष नीलम शिर्के-सामंत तसेच उपाध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, राजू तुलालवार, शैलेश गुजरगुंडे, दिपाली शेळके, वैदही चावरे, संजय रहाटे,आदी यानी कळवले आहे.

# बीडकरांच्या घशाला कोरड तरी नगरपालिका प्रशासनाला फुटेना पाझर

### शिवसंग्रामचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

बीड (सरकार): शहराच्या नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील समस्या जाणून घेवून त्या समस्यांचे निराकरण करणे हे नगर पालिकेचे कर्तव्य असते परंतु बीड नगरपालिकेत मात्र उलट होताना दिसत आहे. मागील काळात सत्ताधारी लोकप्रतिनिधीकडून बीड शहरातील नागरिकांच्या शहरीकरणाच्या सुविधाबाबत सातत्याने दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. आणि आता प्रशासक देखील दुर्लक्ष करत आहे. गेले एक महिन्यापासून ऐन उन्हाळ्यात बीड शहरात पाणी पुरवठा केला जात नाही. त्यामुळे बीडकारांना प्रचंड पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. यामुळे बीडकारांच्या घशाला अक्षरशः कोरड पडली असून देखील नगरपालिका प्रशासनाला पाजार फुटत नाही. त्यामुळे आज बीड शिवसंग्रामच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून बीड शहरातील नागरिकांना वेळेवर पाणी मिळणे नाही. अँड उन्हाळ्यात उष्णतेची तीव्रता वाढलेली असताना देखील नगरपालिका प्रशासन बीड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी असमर्थ ठरली आहे गेली अनेक वर्षापासून बीड शहराला पंधरा दिवसाला पाणीपुरवठा करण्यात येतो. मात्र उन्हाची तीव्रता वाढत असतानाच पाईपलाईन दुरुस्तीच्या नावाखाली बीड शहराला एक महिन्यापासून वेठीस धरणाचे काम नगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)